**प्रसिद्धिपत्रक**

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६
फोन नं. ०२०-२६६८५०००

जा.क्र./पोउआ/वाह/ ६८८६/२०२४ पुणे दिनांक – २८/०९/२०२४

दि. २९/०९/२०२४ रोजी मा. व्हि.व्हि.आय.पी. यांचा पुणे दौरा असल्याने, पुणे शहरातील सर्व वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/ टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, सर्व वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**दि. २९/०९/२०२४ रोजी शिवाजीनगर ते स्वारगेट मेट्रो लाईनचे उद्घाटन होणार आहे त्याकार्यक्रमास मा. व्हि.व्हि.आय.पी. व विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमा दरम्यान वाहन चालकांची गैरसोय होवु नये व वाहतुक कोंडी होवु नये म्हणुन खालील नमुद रस्त्यावर सकाळी ०७/०० वा पासुन आवश्यकते नुसार वाहतुकी मध्ये व पार्किंग मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.**

**१) गणेश कला क्रिडा केंद्र व स्वारगेट मेट्रो स्टेशन परिसर-**

- जेधे चौक ते बजाज पुतळा रस्त्यावर सर्व प्रकारच्या वाहनांना सकाळी ०७/०० वा. ते आवश्यक वेळेपर्यंत नो पार्किंग करण्यात येत आहे.
- जेधे चौक ते बजाज पुतळा चौक दरम्यान आवश्यकते नुसार दुतर्फा वाहतुक सुरु करण्यात येईल
- जेधे चौक ते बजाज पुतळा चौक दरम्यान आवश्यकते नुसार सर्व वाहनांना प्रवेश बंद राहील

पर्यायी मार्ग –जेधे चौकात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहन चालकांनी जेधे चौकातून सातारा रोडने व्होल्गा चौकात जावे उजवी कडे वळण घेवुन मित्र मंडळ चौक उजवीकडे वळण घेवुन सावरकर पुतळा चौक येथुन इच्छित स्थळी जावे.

- सातारा रोड वरुन येणाऱ्या वाहनचालंकाना जेधे चौक उड्डाण पुल सोलापुर रस्त्याकडे जाण्यासाठी सुरु राहील

**२) सिव्हिल कोर्ट मेट्रो स्टेशन परिसर-**

- छत्रपती शिवाजी पुतळा चौक ते कामगार पुतळा चौक व तोफखाना चौक ते रानडे पथ या दोन्ही रस्त्यावर सकाळी ०७/०० ते १६/०० वा. दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांना नो-पार्किंग करण्यात येत आहे.
- छत्रपती शिवाजी पुतळा चौक ते कामगार पुतळा चौक हा मार्ग अत्यावश्यक वेळी दुहेरी वाहतुक सुरु करण्यात येईल

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :-** २)**सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ३,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.